# उन्हाळी काकडी लागवड आणि पिक व्यवस्थापन

डॉ. नेहा काळे
सहाय्यक प्राध्यापिका

डॉ. अतुल मुराई
प्राचार्य

प्रा. विद्या पवार
सहाय्यक प्राध्यापिका

कृषि महाविद्यालय, आचळोली, महाड
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

महाराष्ट्रामध्ये काकडीची लागवड जवळ जवळ सर्व जिल्ह्यांमध्ये होते. काकडी हे पीक मूळचे भारतीय असल्यामुळे त्याचे अनेक प्रकार आढळतात. काकडीमधील 'वाळूक' हा प्रकार रब्बी ज्वारीत, करडईत मिश्र आगर आंतरपिक म्हणून कोरडवाहूत घेतात. काकडीला उन्हाळ्यात जास्त प्रमाणात मागणी असते. जर शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात योग्य नियोजन करून चांगले उत्पन्न घेतले तर शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होऊ शकतो. उन्हाळी हंगामासाठी मात्र पुणेरी खिरा व नवीन वाण हिमांगी काकडी याला जास्त मागणी व मोठा बाजार आहे.



### जमिन:

काकडी पिकाच्या लागवडीसाठी मध्यम किंवा रेताड जमिन जास्त प्रमाणात उपयोगी आहे. जास्त खोल व निचरा होणाऱ्या जमिनीतही लावणी करता येते.

### हवामान:

काकडी हे उष्ण आणि कोरड्या हवामानात वाढणारे पीक आहे. काकडी पिकाच्या उत्पादनात हवामान या घटकाचा फार प्रमाणात प्रभाव पडतो. साधारणपणे काकडी पिकास उष्ण हवामान लाभदायी असते. लागवडीच्या वेळी ११ अंश सेल्सिअस पेक्षा तापमान कमी नसावे जर तापमान यापेक्षा कमी असेल तर पिकाच्या उगवण शक्तीवर त्याचा परिणाम होतो. काकडी पिकाच्या वाढीसाठी कमीतकमी १८ ते जास्तीतजास्त २४ अंश सेल्सिअस तापमान योग्य असते.

### काकडी लागवडीचा कालावधी:

उन्हाळी काकडी पिकाची लागवड जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात करणे महत्वाचे असते. लागवड करण्याआधी शेताची चांगली मशागत करून योग्य प्रमाणात शेणखताचा पुरवठा करावा. जर माती परीक्षण केलेले असेल तर उत्तम. १०० किलो नत्र, ५० किलो पालाश, ५० किलो स्फुरद या रासायनिक खतांचा पुरवठा योग्य प्रमाणात करावा. नत्राचा पुरवठा एकाच वेळेस न करता दोन टप्प्यात विभागून द्यावा. रासायनिक खतांचा पुरवठा खुरपणी झाल्यानंतर साधारणत: ३ आठवड्यांनी पहिला डोस व ६ आठवड्यानंतर दुसरा डोस द्यावा.

### वाण:

पुसा संयोग, पुना खिरा, शीतल, शाईन, हिमांगी, फुले शुभांगी, मालिनी, प्रिया हे काकडीचे वाण मुख्य प्रमाणात घेतले जातात.

### बीजप्रक्रिया:

प्रथम प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरमची प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत वाळवून त्यानंतर प्रति १० किलो बियाण्यास रायझोबियम जीवाणू संवर्धकाची २५० ग्रॅम या प्रमाणात प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत सुकवून पेरणीसाठी वापरावे. पिकाकरीता हेक्टरी २.५ ते ४ किलो बियाणे लागते.

### लागवड पद्धत:

काकडी पिकाची लागवड सरी-वरंबा पद्धतीने केलेली चांगले असते. १.५ ते १ मी. चे आळे पाडून ३ फुटाची सरी पाडावी व त्यात ९० सेमी अंतरावर टोकन पद्धतीने लावणी करावी. लागवडीच्या वेळी खोल नांगरट करून घ्यावी. त्यामध्ये कुजलेले शेणखत ३० ते ४० गाड्या टाकावे व बेड अथवा सरी वर १ ते १.५ मीटर अंतरावर एका ठिकाणी २ बिया रोवून लागवड करावी. तसेच लागवड करते वेळी बुरशीनाशक (बाविस्टीन) जमिनीत ड्रिंचिंग करावे नंतर लागवड करावी.

### पाणी व्यवस्थापन:

जमिनीचा मगदूर पाहून व इतर वेळेस गरज ओळखून पाण्याचा योग्य तो पुरवठा करावा. काकडी पिकास पाण्याचा ताण पडू देऊ नये. जर उन्हाळ्यात उन्हाचे प्रमाण जास्त असेल अन पाण्याचा ताण आला तर वेल पिवळे पडतात. शक्यतो फुलधारणेच्या वेळी पाणी योग्य प्रमाणात देणे फार महत्वाचे आहे. पाण्याचा ताण देऊन एकदम जास्त प्रमाणात पाणी दिल्यास फळांना तडे पडू शकतात. काकडीत मादी फुलांची वाढ होणे उत्पादन वाढीच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. त्याकरिता जिब्रेलिक ॲसिड १०-२५ पीपीएम किंवा बोरॉन ३ पीपीएम च्या फवारण्या पीक २-४ पानांवर असताना कराव्या. त्यामुळे मादी फुलांची वाढ होण्यास मदत होते. अन्नद्रव्याची कमतरता किंवा प्रमाणातील अधिकता काकडीच्या उत्पादन वाढीसाठी योग्य नाही.

### खत व्यवस्थापन:

लागवड करण्यापूर्वी जमिनीमध्ये ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश सरीच्या बगलीत अगर आळ्यात द्यावे. नंतर १९:१९:१९ हे खत लागवड झाल्यावर साधारण १० दिवसांनी द्यावे. ८ दिवस म्हणजे वेलीची वाढ चांगली झाल्यानंतर ५० किलो नत्राचा दुसरा हप्ता ३० ते ४५ दिवसांनी द्यावा.

### संजीवकाचा वापर:

नुकतेच वेल उगवल्यावर २-३ पानांवर असताना एन ए ए १०० पीपीएम अगर एथ्रेल २५० पीपीएम फवारणी द्यावी. काकडीत या फवारणीमुळे मादी फुलाचे प्रमाण वाढते. फळांची संख्या वाढते. लागवडीपुर्वी संजीवक आणून ठेवावे. हिमांगी काकडीला या फवारणीचे अनुभव अतिशय चांगले आहेत.

### आंतरमशागत:

आंतरमशागतीमध्ये काकडी खुरपून तण विरहित ठेवणे महत्वाचे आहे. पावसामुळे वेलीची मुळे उघडी पडल्यास मातीची भर द्यावी. भर देणे ही महत्वाची बाब आहे. वेलीस फळे येण्यापूर्वी फळे व मातीचा संपर्क टाळण्यासाठी तण, गव्हाचे काड आगर तुरकाट्याच्या फळाच्या साली खाली ठेवाव्यात. यामुळे फळे कुजण्याचे प्रमाण कमी होईल.

### वेलींना आधार देणे:

लागवड केल्यानंतर १५ ते २० दिवसांनी वेलींना बांबूचा मंडप तयार करून आधार द्यावा. यामध्ये मंडप तयार झाल्यावर सुतळीच्या सहाय्याने वेलीस आधार द्यावा. सुतळीचे एक टोक वेलीच्या खोडाजवळ बांधावे तर दुसरे टोक वेलीवरील तारेस बांधावे.



### किड व्यवस्थापन:

#### १) मावा:

पानातील रस शोषण करतो. त्यामुळे वेली निस्तेज होते. पिकाची वाढ खुंटते.

उपाय:

टाटा माणिक ८ ते १० ग्रॅम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी. अथवा निम अर्क २५ - ३० ग्रॅम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी.

#### २) तुडतुडे:

पानातील रस शोषण करते.

उपाय:

अरे ८ ते १० ग्रॅम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी. अथवा निम अर्क २५ - ३० ग्रॅम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी.

#### ३) पांढरी माशी:

पानातील रस शोषण करते.

उपाय:

उलाला ८ ते १० ग्रॅम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी.

#### ४) पाने खाणारी अळी व फळातील अळी:

पाने खाते व फळाच्या आतमध्ये अळी तयार होते. त्यामुळे फळ वाकडे होते.

उपाय:

निम अर्क २५ - ३० ग्रॅम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी व किडलेली फळे काढून टाकावी नंतर फवारणी करावी.

### रोग व्यवस्थापन:

#### १) फळकूज आणि खोडकूज:

हा काकडी पिकावरील मुख्य रोग आहे.

उपाय:

मॅन्कोझेब किंवा क्लोरोथॅलॉनॉल २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

#### २) मर रोग:

पाणी जास्त दिल्यामुळे किंवा वातावरणातील बदलामुळे रोपाची मर होते.

उपाय:

पिकाच्या आवश्यकतेनुसार पाणी द्यावे तसेच रोपाच्या बुडाजवळ बुरशीनाशकाचे ड्रिचिंग करावे किंवा फवारणी करणे.

#### ३) पांढरी बुरशी:

यामध्ये पानाच्या दोन्ही बाजूस पांढऱ्या बुरशीची वाढ झालेली दिसते.

उपाय:

मेटॅलॅक्सील किंवा मॅन्कोझेब २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### काढणी:

फळांची काढणी ही फळे कोवळी असतानाच करावी. म्हणजे मार्केटला चांगला बाजार भाव मिळतो. बियाणे टोकल्यापासून साधारणत: ३० – ४० दिवसांत फळे येतात. दर २-४ दिवासांनी तोडणी करावी.

### उत्पादन:

सरासरी उत्पादन २०० ते ४०० क्विंटल मिळते.

(संपर्क: +९१ ८६९८९७२२६३
+९१ ८९७५६३४४४३)

★ ★ ★